जळगाव जिल्हा पोलीस
दिनांक २६/०४/२०२५

प्रति,

-: प्रेस नोट :-

मा.संपादक ,

---------------

**जळगाव शहरामध्ये सोनसाखळी जबरी चोरी करणाऱ्या परराज्यातील अट्टल गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखा जळगाव कडून अखेर जेरबंद.**

जळगाव शहरातील बजरंग बोगदा व शिवाजी नगर परीसरात महीलांची सोनसाखळी जबरी चोरी केल्याने जिल्हापेठ पोलीस स्टेशन व जळगाव शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदरचा गुन्हे हे गंमीर स्वरुपाचे असल्याने ते उघडकीस आणण्याबाबत मा.पोलीस अधीक्षक सो.श्री महेश्वर रेड्डी यांनी स्थानीक गुन्हे शाखा पथकास व पोलीस स्टेशन यांना सुचना दिल्या होत्या.

वर नमुद गुन्हयाच्या अनुशंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक बबन आव्हाड, स्थानीक गुन्हे शाखा यांनी पोउपनि शरद बागल, सहायक फौजदार संजय हिवरकर, विजयसिंग पाटील, अतुल वंजारी, राजेश मेढे, पोलीस हवालदार विजय पाटील,हरीलाल पाटील,अक्रम शेख, यांचे पथक तयार करण्यात आले होते. सदर नमुद पथकाने जळगाव शहरातील विवीध भागातील सीसीटीव्ही कॅमेरांची पाहणी करुन, व गोपनीय माहीतीच्या आधारे अभिलेखावरील परराज्यातील जबरी चोरी करुन महीलांची सोनसाखळी लांबविणारा इसम नामे माधव श्रावण बोराडे वय २९ वर्ष, रा.५०, गुरूशंकर नगर, व्दारकापुरी इंदोर राज्य मध्यप्रदेश याची ओळख पटल्याने, नमुद पोलीस पथकाने त्यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता, त्याने खालीलप्रमाणे जळगाव शहरामध्ये जबरी चोरी केल्याचे कबुल केले.

| अ.क्रं. | पोलीस स्टेशन | गु.र.क्रं.व कलम |
|---|---|---|
| ०१ | जिल्हापेठ पोलीस स्टेशन | ९५/२०२५ बीएनएस कलम ३०४(२) |
| ०२ | जळगाव शहर पोलीस स्टेशन | १५०/२०२५ बीएनएस कलम ३०४(२) |
| ०३ | जळगाव शहर पोलीस स्टेशन | १२८/२०२५ बीएनएस कलम ३०३(२) |

तरी वरीलप्रमाणे गुन्हयाची कबुली दिल्याने त्याच्याकडुन खालीलप्रमाणे किंमती मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

१. किंमत अंदाजे १,०८०००/- किंमतीची १२.०० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जु.वा.

२. किंमत अंदाजे १,८०,०००/- किंमतीची २०.०० ग्रॅम वजनाचे सोने.

**एकुण किंमत २,८८,०००/-**

वरील गुन्हयातील आरोपी इसम माधव बोरडे याचा पोलीस अभिलेख पाहीला असता, तो अट्टल चोऱ्या करणारा सराईत असुन, त्याचे विरूध्द इंदौर (M.P) येथे ६ गुन्हे दाखल आहेत.

तरी सदर आरोपी नामे माधव श्रावण बोराडे वय २९ वर्ष, रा.५०, गुरूशंकर नगर, व्दारकापुरी इंदोर राज्य मध्यप्रदेश याची वैद्यकीय तपासणी करुन, मुद्देमालासह जिल्हापेठ पोलीस स्टेशन गु.र.क्रं. ९५/२०२५ बीएनएस कलम ३०४(२) यास पुढील कारवाई करण्याकामी जिल्हापेट पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा.श्री अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री संदीप गावीत जळगाव उपविभाग, श्री.बबन आव्हाड, पोलीस निरीक्षक, स्थागुशा जळगाव यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि शरद बागल, सहायक फौजदार संजय हिवरकर, विजयसिंग पाटील, अतुल वंजारी, राजेश मेढे, पोलीस हवालदार विजय पाटील,हरीलाल पाटील,अक्रम शेख,सर्व नेम.स्थागुशा जळगाव अश्यांनी केली आहे.

( बबन आव्हाड )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा जळगाव